# ई-निविदा सूचना तिसरी मागणी

**मालवण नगरपरिषद, मालवण**

**जा.क्र.मानप/वि.वि./ई-निसूक्र.04/अपारंपारिक ऊर्जा स्त्रो.वि.2019-20/ 1027/2020 दि.21/07/2020**

**महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण यांजकडील आवश्यक त्या वर्गामधील नोंदणीकृत अनुभवी मक्तेदारांकडून, अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा विकास सन 2019-20 या योजने अंतर्गत** खालील नमूद कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत असून त्याबद्दलचा इतर सर्व सविस्तर तपशिल शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच ई-निविदा प्रपत्र रक्कम व बयाणा रक्कम मालवण नगरपरिषदेच्या खात्यामध्ये NEFT /ऑनलाईन माध्यमातून भरुन सर्व तपशिलासह विहित नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने विहित कालमर्यादेत ई-निविदा सादर करावी.

(आकडे रुपयात)

| अ क्र | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम चालू दरसूचीनुसार सन 2019-20 | निविदा किमंत | बयाणा रक्कम 2% | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | मामा वरेरकर नाटयगृह मालवण येथे सौर विदयुत संच आस्थापित करणे. (20KW) | रु.9,60,000/- | रु.590/- | रु.19,200/- | देयकातून 8% किंवा B.G./ F.D.R./T.D.R या स्वरुपात | 04 महिने (पावसाळा कालावधी वगळून) |
| 2 | जल शुध्दीकरण केंद्र कुंभारमाठ, मालवण येथे सौर विदयुत संच आस्थापित करणे(10KW) | रु. 5,40,000/- | रु.590/- | रु.10,800/- | | 03 महिने (पावसाळा कालावधी वगळून) |

## अटी व शर्ती

1 वरील कामाची निविदा प्रक्रिया ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाईन करण्यात येत असून या निविदेसंबंधी यापुढील सर्व सूचना / शुध्दीपत्रके www.mahatenders.gov.in या वेबसाईटच्या माध्यमातून ऑनलाईन प्रसिध्द करण्यात येतील.

2 **वरील कामाबाबत संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून दि.22/07/2020 ~~सायंकाळी~~ सकाळी 11.00 वाजलेपासून दि.03/08/2020 रोजी सायंकाळी वाजेपर्यत डाऊनलोड करुन भरता येईल. निवीदा पूर्व बैठक दि. 28/07/2020 रोजी वा. मा. मुख्य अधिकारी, मालवण नगरपरिषद यांचे दालनामध्ये आयोजित केली आहे.**

3 सदर कामाच्या निविदा बाबत खालील बाबी आवश्यक राहतील.

अ) निविदा सादर करतांना वरील रकाना 4 व 5 मध्ये दर्शविलेली रक्कम मुख्य अधिकारी, मालवण नगरपरिषद, मालवण यांचे खात्यावर online / NEFT माध्यमातून राष्ट्रीयकृत बँकेत जमा करावी. तसेच त्याबाबतची रिसीट/ चलन प्रत स्कॅन करुन अपलोड करावी.

आ) कंत्राटदाराचे योग्य त्या वर्गातील महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (MEDA) किंवा (MNRA) यांजकडील वैध नोंदणी / चॅनल पार्टनर प्रमाणपत्राची प्रत, पॅनकार्ड प्रमाणपत्र प्रत, आयकर नोंदणी प्रमाणपत्र प्रत, जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र प्रत, अपलोड करावी.

इ) स्थळ पहाणी प्रमाणपत्र, बारचार्ट तांत्रिक लखोटयामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

ई) तसेच मागील तीन वित्तीय वर्षामध्ये प्रत्येकी किमान रक्कम रु. 30.00 लक्ष पर्यंत आर्थिक उलाढाल असल्याबाबतचे लेखापरीक्षण अहवाल जोडणे आवश्यक आहे.

**उ)** निविदा प्रपत्रातील Declaration of the Contractor विहित नमुन्यातील (AppendixA) कंत्राटदाराने स्वाक्षरी केलेली विहित नमुन्यामधील (हाती असलेल्या कामांचा तपशील (Work in Hand), पूर्ण कामांचा तपशील (Work Done Certificate इत्यादी) बी 1 फॉर्ममध्ये नमूद केल्याप्रमाणे स्टेटमेंटस प्रत अपलोड करावी.

परिशिष्ट "अ", परिशिष्ट "ब", व इतर असे एकत्रित सत्यप्रतिज्ञापत्र आपत्कालीन परिस्थिती विचारात घेता **निविदाधारक यांनी स्वपत्रावर (Letter Head) सादर करावे.** निविदा मंजूरीनंतर मंजूर निविदाधारक यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर नोंदणीकृत सत्यप्रतिज्ञापत्र कार्यादेशापूर्वी सादर करणे बंधनकारक राहील **(प्रतिज्ञापत्र नमुना निविदेसोबतच्या B1 नमुन्यामधील पा.नं. 63 व 70 वर दर्शविण्यात आलेला आहे.)**

ऊ) किमान 20 कि. वॅट क्षमतेचे **2** पारेषण संलग्न सौर विदयुत संच आस्थापीत केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. तरी त्यानुसार अशा स्वरुपाचे संच आस्थापीत केल्याचे कार्यारंभ आदेश व तसे संच यशस्वीपणे आस्थापीत केल्याचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक (**work done certificate**) सादर करणे आावश्यक आहे.

उ) निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा सुचना मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक आहेत.

IMP

4. **निविदेतील दर हे वस्तु व सेवाकर (GST) विरहीत आहे. सबब निविदा दर वस्तु व सेवाकर (GST) सह दयावयाचे आहेत याची सर्व निविदाधारक यांनी कृपया नोंद घ्यावी.**

5. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या निविदा उघडणेची तारीख दि.05/08/2020 रोजी 11.00 वा. वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यात येतील. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएटी/2017/प्रक्र.08/इमा-2 दि. 26/11/2018 या शासन नियमानुसार परिच्छेद क्र. 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लिफाफा क्र. 1 व 2 उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणारे L1 निविदाधारकाने अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम" (Additional performance security deposit) आठ दिवसांच्या आत मा. मुख्य अधिकारी, मालवण नगरपरिषद यांचे कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक राही**ल.**

तसे न केल्यास उपरोक्त नमूद शासन निर्णयानमधील निर्गमित केलेल्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

6. मंजूर निविदाधारकाने निविदांचे कामाचे किमंतीनुसार योग्य त्या मुद्रांक शुल्क पेपरवर कामाचा करारनामा करुन देणे बंधनकारक आहे

7. निविदाधारक यांनी सदर कामाची व्याप्ती व स्वरुप मालवण नगरपरिषद विदयुत विभाग यांजकडून घेवून प्रत्यक्ष कामाची जागा, साहित्य उपलब्धता इ. बाबत पाहणी करुन निविदा दर सादर करणे आवश्यक राहील.

8. **उपरोक्त ई-निविदेबाबत कोणतेही माहिती अथवा मुद्दयाबाबत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास ई-निविदा सादर करावयाच्या अंतीम दिनांकापूर्वी (दि.31/07/2020 कार्यालयीन वेळेपर्यंत) ई-मेलद्वारे या कार्यालयास लेखी अवगत केल्यास त्याचे स्पष्टीकरण /निराकारण ई-मेलद्वारे केले जाईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी.**

9. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 च्या तरतूदी या निविदेला लागू राहतील. तसेच प्रत्यक्ष होणा-या कामाच्या देयक रक्कमेनुसार 12% वस्तु व सेवाकर (GST) रक्कम नियमानुसार व प्रचलित शासन निकषानुसार नगरपरिषदेकडून देय राहील.

10. सदर कामाची निविदा मंजूर झाल्यानंतर नियमानुसार आयकर, GST कर, कामगार कल्याण उपकर व इतर आवश्यक त्या कपाती देयकातून करण्यात येतील .

11. सदर कामास दरवाढ लागू असणार नाही. बालकामगार कामावर ठेवता येणार नाहीत.

12. **सदर कामाचा दोषदायित्व कालावधी (DLP) किमान 03 वर्ष राहील.**

13. कामाची अंमलबजावणी करताना कोणत्याही बाजारभावानुसार वाढ देण्यात येणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत Escalation देण्यात येणार नाही.

14. सौर विदयुत संच आस्थापित करण्याचे काम सुरु असताना व झाल्यावर महाऊर्जामार्फत आवश्यकतेनुसार सर्वसाधारण (Random) पध्दतीने सौर विदयुत संचाची तांत्रिक तपासणी करण्यात येईल व संबंधितांचा तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर मक्तेदाराला देयक अदा करण्यात येईल.

15. सदर ई-निविदेतील कामाबाबत कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा हक्क नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

16. सदर ईनिविदेमधील कोणत्याही अटी-शर्ती मध्ये बदल/रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्य अधिकारी मालवण यांनी राखून ठेवलेला आहे.

17. मंजूर निविदाधारकास झालेल्या कामांच्या स्वरुपानुसार व निधीच्या उपलब्धतेप्रमाणे देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

18. इतर अटी शर्ती ई-निविदा फॉर्ममध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत व सदरचा निविदा फॉर्म **REQUEST FOR PROPOSAL** (RFP) आणि निविदेसोबत जोडण्यात आलेला तांत्रिक तपशील **(Technical Specification)** या निविदा सूचनेचा अविभाज्य भाग आहे.

21/07/2020

मुख्य अधिकारी
मालवण नगरपरिषद

Signature Not Verified
Digitally signed by SONALI SUDHIR HALDANKAR
Date: 2020.07.21 16:20:17 IST
Location: Maharashtra-MH